**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश हैबतराव पेशवे
प्लॉट नं.८५, 'साफल्य' वाळवेकरनगर, संतनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उपआयुक्त कार्यालय क्र.३, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश हैबतराव पेशवे
प्लॉट नं.८५, 'साफल्य' वाळवेकरनगर, संतनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रवीण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग
उपआयुक्त कार्यालय क्र.३, पुणे श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** (कालावधी १९९३ ते २००७)<br><br>रास्ता पेठ, पुणे येथील मिळकत स.नं.२६३ बाबत. बिल्डर, विकासक व महानगरपालिका यांच्यामध्ये झालेल्या कराराची प्रत, भाडेकरुंनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रती. | |

## विवेचन

नवीन इमारतीला भोगवटा दाखला देण्यापूर्वी भाडेकरुना जागेचा ताबा मिळाला का, त्यांच्या ना हरकत पत्राच्या प्रती इ.माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता क्र.४, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची पूर्वी सुनावणी झाल्याचे नमूद करुन अपील फेटाळले व दुसरे अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करावे असे कळविले, म्हणून अपीलकर्ता श्री.सुरेश हैबतराव पेशवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण मागितलेल्या तीनपैकी एकाही मुदयाची माहिती दिलेली नाही, असे श्री.पेशवे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मात्र पूर्वी एका विषयात हीच माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरात यांनी दिलेली आहे व शुल्कही भरुन घेतलेले आहे. त्यामुळे नव्या अर्जावर माहिती दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता श्री.श्याम ढवळे यांनी नमूद केले. दि.२.६२००७ चा अर्ज असून त्यावर उत्तर दिले गेले नाही, असे श्री.पेशवे यांनी निदर्शनास आणले.

राहिलेली माहिती एका आठवड्यात देण्यात येईल असे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री.प्रवीण गेडाम यांनी सांगितले.

त्यानुसार दि.२०.८.२००८ रोजी श्री.पेशवे यांना माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका यांनी कळविले. परंतु त्यातही मुद्दा क्र.२ ची माहिती दिलेली नाही. विकास अभियंता(बांधकाम नियंत्रण), पुणे महानगरपालिका यांच्या कार्यालयामध्ये झालेल्या सुनावणीच्या कार्यवृत्तांताची चार पाने देत असल्याचे या पत्रात जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले असताना प्रत्यक्षात दोन पानेच जोडली आहेत, तसेच सुनावणीच्या वेळी झालेल्या सर्व चर्चेची नोंद योग्य प्रकारे केलेली नाही. 'प्रकरणी भाडेकरुंचे ना हरकत पत्र समाविष्ट नसल्याने त्याच्या प्रती देता येणे शक्य नाही,' असे जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे यांनी या पत्रात कळविले आहे. मात्र नगरअभियंता, महानगरपालिका, पुणे यांनी दि.२६.८.२००५ रोजी आपल्याला पाठविलेल्या (जा.क्र.०/अजा/००१/१४६३) पत्रामध्ये, 'प्रकरणी आवश्यक ती ना हरकत प्रमाणपत्रे दाखल करुन भोगवटा पत्र मागणी केल्याने दि.१३.९.२००४ रोजी इमारतीचे भोगवटा पत्र दिलेले आहे,' असे कळविले आहे. यावरुन आपल्याला दिशाभूल करणारी व चुकीची माहिती देत आहेत, असे दिसते. भाडेकरुंच्या पुनर्वसनासाठी मंजूर केलेले चटई क्षेत्र व सदनिका पूर्वीच्या रहिवाशांशिवाय इतरांना विकणे या अनुषंगाने बिल्डरवर डी.सी.रुल ६.१० अन्वये केलेली कारवाई याबाबत माहिती विचारली होती. याविषयी आपण पूर्वी तक्रार केली होती, त्या अनुषंगाने दि.२६.८.२००५ रोजी विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांनी प्रवर्तकास खुलासा विचारण्यात आल्याचे व ०.७५ एफएसआय चटई क्षेत्रानुसार असलेले भाडेकरु व सध्या असलेले फ्लॅटधारक यांच्याबाबत विधी सल्लागारांचा अभिप्राय घेतल्यानंतर कळविण्यात येईल, असे कळविले होते. त्याबाबतची कोणतीही माहिती दिलेली नाही, असे श्री.पेशवे यांनी दि.२९.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले.

संबंधित इमारतीच्या अनुषंगाने श्री.पेशवे सातत्याने विविध पातळ्यांवर अर्ज व अन्य पत्रव्यवहार करीत आले आहेत, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. श्री.पेशवे यांना स्वत:ला सदनिका न दिल्याच्या विषयाचा संदर्भ त्याला आहे. त्या अनुषंगाने वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आलेली दिसते. विकास अभियंता यांच्याकडील सुनावणीच्या

नोंदीसंदर्भातील त्यांच्या आक्षेपाची दखल माहितीच्या अधिकारात घेता येणार नाही. मात्र भाडेकरुंच्या ना हरकत पत्रांबाबत विकास अभियंता (दि.२६.८.२००५) व जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (२०.८.२००८) यांच्या पत्रामधील नेमकी कोणती माहिती खरी आहे हे स्पष्ट करुन त्यानुसार श्री.पेशवे यांना कळविणे व ना हरकत पत्रे असल्यास त्यांच्या प्रती दिल्या जाणे आवश्यक आहे. तसेच बिल्डरवरील कारवाईबाबतची वस्तुस्थितीही श्री.पेशवे यांना अवगत केली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) भाडेकरुंची ना हरकत पत्रे व बिल्डरवरील कारवाई या संदर्भातील माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, उपआयुक्त कार्यालय क्र.३, पुणे यांनी दि.१०.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पी.ए.दिनदयाळ आरमुगम नायकर
घ.नं.९७४, बुधवार पेठ, तेली आळी,
तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पी.ए.दिनदयाळ आरमुगम नायकर
घ.नं.९७४, बुधवार पेठ, तेली आळी, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे श्री.पी.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे श्री.एस.के.देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>नगरपरिषदेकडे असलेल्या सरकारी भूखंडाची माहिती. | |

## विवेचन

तळेगाव नगरपरिषदेकडील सरकारी भूखंडांबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद यांच्याकडून मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. नंतर वेगळी माहिती दिली गेली. या कारणावरुन श्री.पी.ए.दिनदयाळ आरमुगम नायकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.१६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम आपल्याला निरंक माहिती असल्याचे उत्तर दिले. त्यानंतर आठ-दहा भूखंड असल्याची माहिती दिली. अशा प्रकारे उपलब्ध सर्व भूखंडांची माहिती न देता दिशाभूल केली गेली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.नायकर यांनी केले. आपल्याला दिलेल्या माहितीसाठी रु.१० प्रतिपृष्ठ असे शुल्क आकारण्यात आले, ते अयोग्य असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क आकारुन आपली ऊर्वरित रक्कम परत मिळावी, अशी मागणीही त्यांनी केली.

श्री.नायकर यांनी विशिष्ट प्रकारचा तक्ता देऊन त्यात माहिती मिळण्याची मागणी केली होती. त्यावरुन त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नव्हते. त्यांचे प्रतिनिधी

श्री.पगारे यांनी ते स्पष्ट केल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. नगरपरिषदेने केलेल्या ठरावानुसार रु.१० प्रतिपृष्ठप्रमाणे शुल्क आकारण्यात आले. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेली शुल्करचना बदलता येणार नाही, अशी सूचना आयोगाने दिल्यानुसार उर्वरित रक्कम पूर्वीच परत करावयास हवी होती. ती आता केली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद श्री.एस.के.देसाई यांनी सांगितले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती योग्य आहे. नगरपालिकेकडील सरकारी भूखंडांची माहिती श्री.नायकर यांनी मागितली होती. ती त्यांना देण्यात आली. सरकारी भूखंड वगळून नगरपरिषदेच्या भूखंडांची माहिती मिळावी, अशी मागणी त्यांनी प्रथम अपील सुनावणीदरम्यान तोंडी स्वरुपात केली. तीही त्यांना देण्यात आली आहे असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील यांनी सांगितले. पुनर्वसनासाठी नगरपरिषदेकडून भूखंड मिळण्याचा श्री.नायकर यांचा मुख्य विषय आहे. परंतु ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिपृष्ठ रु.२ व नकाशे आदींसाठी पूर्वी निर्धारित केलेले शुल्क आकारता येईल. या तरतुदीत नगरपरिषद बदल करु शकत नाही, याची समज मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद यांना देण्यात येत आहे. त्यानुसार चार पृष्ठांचे रु.८/- शुल्क वगळता उर्वरित रक्कम श्री.नायकर यांना त्वरित परत करावी तशी श्री.नायकर यांची पोहोच जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद यांनी आयोगाला दि.१५.४.२००९ पर्यंत सादर करावी.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.६.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मुखतार अहमद खान
शॉप नं. २४, तपस्वी प्लाझा,चिंचवड, पुणे-१९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
उपआयुक्त कार्यालय क्र.३ पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मुखतार अहमद खान
शॉप नं. २४, तपस्वी प्लाझा,चिंचवड, पुणे-१९

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उपआयुक्त कार्यालय क्र.३
पुणे महानगरपालिका, श्री. शाम ढवळे, नगर उपअभियंता

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

**८ <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

४४, गणेश पेठ, पुणे येथे केलेले बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे जागेवर झाले आहे का, या अनुषंगाने मागितलेली माहिती

## विवेचन

श्री. मुखतार अहमद मुन्ना खान यांनी ४४, गणेश पेठ, पुणे येथे केलेले बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर झाले आहे का, या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही व बेकायदेशीर बांधकामाबाबत कारवाई केली नाही या कारणावरून अपीलकर्ता श्री. खान यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

बांधकाम चालू करण्यास दि. ५.१०.२००२ रोजी परवानगी मागितली होती. पार्किंगच्या जागेचा व्यावसायीक वापर होत असल्याच्या कारणावरून दि. ३०.३.२००५ रोजी बेकायदेशीर बांधकाम पाडले होते. सध्या पार्किंगच्या जागेची परिस्थिती काय आहे व बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (Completion Certificate) संबंधितांनी घेतले आहे काय, ही माहिती आपल्याला दिली गेली नाही, असे श्री. खान यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. संबंधित जागेबाबतची कागदपत्रे सुमारे २० ते २२ वर्षापूर्वीची आहेत व ती उपलब्ध नसल्याचे अभिलेख विभागाने कळविलेले आहे. बांधकाम सुरू करण्यास दिलेल्या परवानगीचे पत्र किंवा त्याबाबतचा तपशील अपीलकर्त्याने दिलेला नाही, तो दिल्यावर माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. बांधकाम सुरू करण्यास दि. ५.१०.२००२ रोजी परवानगी दिली असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

अपीलकर्त्याने संबंधित बांधकामाबाबतची कागदपत्रे दिल्यास माहितीबाबत शहानिशा करता येईल. सन २००२ या संपूर्ण धारिकेच्या छायांकित प्रती निःशुल्क दिल्या जातील, असे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. गेडाम यांनी सांगितले. अपीलकर्त्याने बांधकाम सुरु करण्याच्या पत्राची प्रत दिली नाही, आठ दिवसात सर्व माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. परंतु त्यानुसार आपल्याला माहिती दिली गेली नाही, असे श्री. खान यांनी दि. २६.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे. मात्र श्री. खान यांच्याशी चार वेळा दुरध्वनीवरून संपर्क साधूनही संबंधित पत्राची प्रत / कागदपत्र त्यांनी न दिल्यामुळे माहिती देता आलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला दि. २८.८.००८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

अपीलकर्त्याने मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात मागितलेली आहे, ते योग्य नाही. बेकायदेशीर बांधकामाबाबत कारवाई करण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जयानंद माधवराव नायकोडी
१०३, मारुती अपार्टमेंट, मराठी शाळेजवळ, खारगाव, ठाणे-४००६०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे श्री.सुनील देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे श्रीमती शिल्पा कडू

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जा.क्र.आस्थापना/विकास/कालेप्र/१४८/सुनावणी, दि.१२.३.१९८० अन्वये काढण्यात आलेली नोटीस, त्याअन्वये घेतलेले जाबजबाब, दिलेला निर्णय, हजर असलेले लोक. साक्षांकित प्रती मिळाव्यात. |
|---|---|

## विवेचन

आपण मागितलेली माहिती २० वर्षांपूर्वीची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(३) अन्वये ती देण्यास बंधन नाही, असे चुकीचे उत्तर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.जयानंद माधवराव नायकोडी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्री.नायकोडी यांनी दि.१२.३.१९८० रोजी काढण्यात आलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतु नोटिशीचा नेमका तपशील दिलेला नाही. त्यात नमूद केलेला जावक क्रमांक हा जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचा नाही. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या नोटिशीची कागदपत्रे 'क' वर्गातील असल्याने पाच वर्षानंतर नाश केली जातात, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुणे श्रीमती शिल्पा कडू यांनी सांगितले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री.सुनील देशमुख यांनी नमूद केले. अपीलकर्त्याने नोटिशीचा नेमका तपशील दिल्यास जतनाच्या कालावधीतील संबंधित कागदपत्रे देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन योग्य आहे. मात्र २० वर्षांच्या आतीलच माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ च्या कलम ८(३) प्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे, हे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.कांबळे व अपिलीय प्राधिकारी श्री.सुनील देशमुख यांचे प्रतिपादन चुकीचे आहे. कायद्यातील तरतुदीबाबत अशा प्रकारचे निराधार विधान त्यांनी करता कामा नये, याची समज श्री.एम.एस.कांबळे व श्री.सुनील देशमुख यांना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे सचिव/अध्यक्ष,बहुजन एम्प्लॉईज फेडरेशन,६३९,उत्तर सदर बझार,सोलापूर यांची खालीलअपिले प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|
| १ | १४५९/ सोलापूर | गट शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, सोलापूर | विस्तारअधिकारी (शिक्षण), जिल्हा परिषद,सोलापूर | शालेय पोषण आहाराबाबतच्या माहितीच्या नकला |
| २ | १४६०/ सोलापूर | गट शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, सोलापूर | विस्तारअधिकारी (उर्दू शिक्षण), जिल्हा परिषद,सोलापूर | शालेय पोषण आहाराबाबतच्या माहितीच्या नकला |
| ३ | १४६१/ सोलापूर | उप शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद,सोलापूर | वार्षिक तपासणी अहवाल २००२-२००३ ते२००४-२००५, इ.५वी ते ७ वी विनाअनुदानीत तुकडया मान्यता आदेशाच्या प्रती, वार्षिक तपासणीअहवालातीलमुद्दा क्र.१४(अ)१ते८शिक्षक कर्मचारी हजर अहवाल प्रती व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. |
| ४ | १४९३/ सोलापूर | माहिती अधिकारी, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,सोलापूर | सहारा अपंग प्रशिक्षण केंद्र, सोलापूर मधील जुन्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी. |
| ५ | १४९४/ सोलापूर | मुख्याध्यापक, रमाबाई अपंग प्रशिक्षण केंद्र,प्लॉट नं.५,बजरंग नगर, विमानतळ, होटगी रोड, सोलापूर | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,सोलापूर | सहारा अपंग प्रशिक्षण केंद्र,सोलापूर मधील मान्यता प्राप्त कर्मचा-यांना हस्तांतरित शाळेत सामावून घेण्याची मागणी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | १४९५/ सोलापूर | समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,सोलापूर | अपिलीय अधिकारी, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई | श्री.हारून अ.अजीज पठाण विशेष शिक्षक,यांची माहिती |
| ७ | १४९६/ सोलापूर | माहिती अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, पुणे विभाग, पुणे, स्वारगेट | विभागीय समाजकल्याण अधिकारी,पुणे विभाग, पुणे,स्वारगेट | शासन निर्णय दि.८.७.२००४ व १८.८.२००४ अन्वये रमाबाई अपंग प्रशिक्षण केंद्र,सोलापूर येथील कर्मचा-यांना सेवेत रूजू करून घेण्याची मागणी. |
| ८ | १४९७/ सोलापूर | माहिती अधिकारी, अपंग कल्याण आयुक्त कार्यालय,३,चर्च रोड,पुणे -१ | अपंग कल्याण आयुक्त, ३,चर्च रोड,पुणे -१ | दि.१.८.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर काय कारवाई केली,सदर पत्रावर झालेल्या अंतिम निर्णयाची प्रत,दि.२१.७.२००८व २३.७.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या चार मुद्यांबाबत आपणाकडून केलेल्या कारवाईची माहिती,व इतर एकूण १३ मुद्यांची माहिती. |

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ६(१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे,पदनामाने नाही,याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

**आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:-**

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यातील अपिले अ. क्र १ ते ८ (क्र.१४५९,१४६०, १४६१,१४९३,१४९४,१४९५,१४९६ व १४९७) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** २०.८.२००९

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. अब्दुल गफार सुजाउद्दीन मोमीन
शारदा हौसिंग सोसा. टेंभुर्णी रोड, कुर्डूवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर
अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक, भूमी अभिलेख,
सोलापूर
उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, माढा
ता माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६५/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.०९.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.०९.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.१०.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.१२.०८ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>जुना गट नं. २२५ नवा गट नंबर ५१ कुर्डुवाडी यातील प्लॅट १ ते ३२ मोजणीसाठी रू १३,४०० एवढी फी दि. २२.०२.२००० रोजी भरल्यानंतर मोजणी करण्यात आली. परंतू त्याचा नकाशा अद्यापपर्यंत मिळाला नसल्याने नकाशा न देण्याचा खुलासा. | |

**विवेचन**

अपीलकर्ते श्री अब्दुल गफार सुजाउद्दीन मोमीन यांनी जुना गट नं २२५, नवा गट नं ५१, कुर्डुवाडी येथील प्लॉट १ ते ३२ च्या मोजणीसाठी रू १३,४०० /- फी, दि २२.०२.२००० साली भरलेली

आहे. त्याची मोजणीही झाली आहे. त्याचा नकाशा अद्यापपर्यंत मिळालेला नाही. तेव्हा तो नकाशा आपण का देत नाही, याचा खुलासा माहिती देऊन करावा. नकाशा देत नसल्यास भरलेली फी रु १३,४०० व्याजासहित परत करावी, अशी मागणी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, माढा यांच्याकडे केली आहे.

खुलासा, भाष्य, फी परत मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र ९ वर्ष झाली तरी सबंधित कागदपत्रे न मिळाण्याच्या कारणाची अपीलकर्त्या स माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्त्यास नकाशा देण्याबाबतच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि २०.०५.२००९ पर्यंत सादर करावा.

**पुणे**
दि.३०.०४.०९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पोपट नाना बलसाने
जयदीप एन्टरप्रायझेस, पोलीस चौकीसमोर, नवी सांगवी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार संगमनेर,
तहसील कार्यालय, ता.संगमनेर, जि.अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, ता.संगमनेर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पोपट नाना बलसाने
जयदीप एन्टरप्रायझेस, पोलीस चौकीसमोर, नवी सांगवी, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे पिंपरणे, ता.संगमनेर येथील खाते नं.१९५, गट नं.२११ मधील झालेल्या नोंदी व इतर व्यवहाराबाबतची माहिती. फेरफार नं.२८५, गा.न.नं.८अ उतारा(१९९४-१९९५), ७/१२ उतारा तसेच केलेल्या नोंदी कशाच्या आधारे केल्या, जमिनीतील वेळोवेळी केलेल्या खरेदीबाबतची व सर्व संबंधितांची संमतीची कागदपत्रे यांची सविस्तर स्पष्टीकरणासह लेखी माहिती. |

## विवेचन

आपल्या जमिनीच्या खरेदी व फेरफार उताऱ्यामध्ये केलेल्या नोंदी कशाच्या आधारे केल्या याची माहिती अपीलकर्ता श्री.पोपट नाना बलसाने यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, संगमनेर, जि.अहमदनगर यांच्याकडे केली. 'आपण अर्जात मौजे पिंपरणे, ता.संगमनेर येथील गट नं.२११ या नोंदीबाबत व इतर व्यवहाराबाबत माहिती मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे. परंतु इतर व्यवहाराबाबत नेमकी आपणांस कायम माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख अर्जात केलेला नाही. त्यामुळे आपणांस हवी असलेली माहिती पुरविता येत नाही. मौजे पिंपरणे, ता.संगमनेर येथील गट नं.२११ बाबत आपणांस लागणारे फेरफार, गाव नमुना नंबर ७/१२ व त्यासंबंधी लागणारे कागदपत्रांच्या नकलेसाठी सेतू कार्यालय, संगमनेर येथे तपशिलासह अर्ज करावा. म्हणजे आपणांस लागणाऱ्या नकलेसाठी नियमानुसार फी भरुन नकला प्राप्त करुन घ्याव्यात,' असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.ए.जी.सोमणी यांनी श्री.बलसाने यांच्य विविध अर्जांवरील उत्तराद्वारे कळविले. त्याविरुध्द श्री.बलसाने यांनी केलेल्या अपिलात अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, संगमनेर यांनी दिलेल्या निर्णयानुसार माहिती पोस्टाने पाठविण्यात आली. माहिती प्राप्त झाल्याचे श्री.बलसाने यांनी द्वितीय अपिलाच्या अर्जात मुद्दा क्र.४ मध्ये म्हटले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांनी आयोगाने आयोजित केलेल्या दि.२१.१०.२००८ च्या

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले आहे. मात्र श्री.बलसाने यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात तीनच मुद्दे आहेत व माहिती मिळाल्याचे त्यांनी म्हटलेले नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातही माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव आपल्याला मुख्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या असल्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे तहसीलदार, संगमनेर श्री.ए.एन.पवार यांनी पत्राद्वारे कळविले होते. लोकसभा निवडणुकीचे कामकाज, कायदा व सुव्यवस्था इ. कामामुळे आपण व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहता येत नसल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती जन माहिती अधिकारी श्री.ए.जी.सोमणी व अपिलीय प्राधिकारी श्री.ए.एन.पवार यांनी पत्राद्वारे केली. सुनावणीला उपस्थित राहता येत नसले तरी सबंधित माहितीबाबतचे सविस्तर निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पाठवू शकले असते. श्री.बलसाने यांचा अर्ज दि.१.१०.२००७ चा असून अद्यापपर्यंत माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही निवेदन त्यांनी सादर केलेले नाही, ही बाब गंभीर आहे. श्री.बलसाने यांच्या अर्जात माहितीची मागणी स्पष्ट आहे, असे असतानाही मागणी स्पष्ट नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीदलार श्री.ए.जी.सोमणी यांनी त्यांना कळविणे हे माहिती देण्यापेक्षा टाळण्याचा प्रयत्न दर्शविणारे आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, संगमनेर श्री.ए.एन.पवार यांनीही विहित मुदतीत अपिलावर निर्णय दिलेला नाही. असे असतानाही माहिती दिल्याचे व अपीलकर्त्याने माहिती मिळाली असल्याचे, म्हटल्याचे जन माहिती अधिकारी श्री.ए.जी.सोमणी यांनी नोंदविणे हा सर्वच प्रकार गंभीर आहे. तसेच अपिलाच्या सुनावणीला आपल्याला उपस्थित राहता येऊ नये अशा पध्दतीने पत्रे पाठविण्यात आल्याचे श्री.बलसाने यांनी टपालाच्या तारखांच्या शिक्क्याच्या प्रतीसह नमूद केले आहे. फक्त माहितीच्या अधिकाराखालील सुनावणीच्या नोटिसा पोस्टाने मिळाल्या, बाकीची माहिती मिळाली नाही, असे श्री.बलसाने यांनी नमूद केले. मात्र श्री.बलसाने मागितलेली माहिती सन १९७४ ते २००७ अशा ३३ वर्षांच्या काळातील आहे व त्यांनी मागितलेला गा.न.नं.८-अ उतारा, ७/१२ उतारा यांच्या प्रती त्यांना देण्यात

आल्या आहेत, असे कागदपत्रांवरुन दिसते. फेरफारातील नोंदी कशाच्या आधारे केल्या, हे दर्शविणारी माहिती कागदपत्रांच्या प्रतींसह श्री.बलसाने यांना दिली जाणे आवश्यक असतानाही दिलेली नाही. माहितीच्या अधिकारातील अपिलीय प्राधिकारी म्हणून नव्हे, तर संबंधित कागदपत्रांच्या उपलब्धतेला जबाबदार असणारे प्रशासकीय अधिकारी म्हणून तहसीलदार व निवासी नायब तहसीलदार हे माहिती नाकारण्याला जबाबदार ठरतात, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. त्यामुळे ते कारवाईस पात्र ठरतात. माहिती अपुरी देणे, ती टाळण्याचा प्रयत्न करणे व न देणे याबाबत त्यांना शास्ती व अन्य कारवाई का करु नये याबाबतचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी श्री.ए.जी.सोमणी व तहसीदार श्री.ए.एन.पवार यांनी करणे आवश्यक आहे. तसेच स्पष्टीकरण वा खुलासा अथवा नोंदी दुरुस्त करण्याची अपीलकर्त्याची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र फेरफार प्रक्रियेतील सर्व आधारभूत कागदपत्रे व माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, संगमनेर श्री.ए.जी.सोमणी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, संगमनेर श्री.ए.एन.पवार यांनी अपीलकर्ता श्री.पोपट नाना बलसाने यांना माहिती द्यावी हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) निवासी नायब तहसीलदार, संगमनेर श्री.ए.जी.सोमणी व तहसीलदार, संगमनेर श्री.ए.एन.पवार यांच्यावर शास्ती व अन्य कारवाई का करु नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी दि.१५.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नागेश्वर मारुती भिसे
मु.पो.बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मॅनेजिंग डायरेक्टर,
नीरा-भिमा सहकारी कारखाना रेडा, इंदापूर, — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मॅनेजिंग डायरेक्टर,
नीरा-भिमा सहकारी कारखाना रेडा, इंदापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागेश्वर मारुती भिसे
मु.पो.बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मॅनेजिंग डायरेक्टर,
नीरा-भिमा सहकारी कारखाना रेडा, इंदापूर श्री.बिभीषण भिमराव नवले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.५.२०७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१.१.२००१ ते २००७ पर्यंत - रोजंदारीवरील काम करणारे कर्मचारी यांचे मासिक वेतन, खाड्याचे दिवस याची माहिती. | |

## विवेचन

निरा-भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित यांच्याकडील रोजंदारी कामगाराबाबतची सन २००१ ते २००७ या काळातील माहिती आपल्याला मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.नागेश्वर मारुती भिसे यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२१.१०.२००८ व दि.२६.११.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

जन माहिती अधिकाऱ्यांकडून आपल्याला कोणतेही उत्तर मिळाले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भिसे यांनी केले. परंतु आपण त्यांना उत्तर पाठविले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मॅनेजिंग डायरेक्टर, निरा-भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रेडा, इंदापूर यांनी सांगितले. या उत्तराची प्रत त्यांनी सादर केलेली नाही. रोजंदारीवरील कामगारांचे पगारपत्रक असते, परंतु श्री.भिसे यांनी मागितला तसा रोजंदारीत रजा वगैरे तपशील असत नाही, असे त्यांनी नमूद केले. या पगारपत्रकाची प्रत मिळावी, अशी मागणी श्री.भिसे यांनी केली. ती देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता यांना पाठविलेल्या उत्तराची प्रत जन माहिती अधिकारी तथा मॅनेजिंग डायरेक्टर, निरा-भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रेडा, इंदापूर यांनी सादर करावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते.

(३) निरा-भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रेडा, इंदापूर कारखान्यातील रोजंदारीवरील कामगारांच्या पगारपत्रकाच्या प्रती अपीलकर्ता श्री.भिसे यांना १५ दिवसात निःशुल्क देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता.

(४) वरीलप्रमाणे आदेशातील क्र.२ व ३ च्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मॅनेजिंग डायरेक्टर, निरा-भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रेडा, इंदापूर यांनी दि.२५.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. यानुसार पूर्तता केली नसल्यास ते शास्ती व अनय कारवाईस पात्र ठरतील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.४.४.२००९